# दिनांक ३०/०६/२००९ रोजी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या (मऔविमं यांचेशी संबंधीत )सभेचे इतिवृत्त.

| अक्र/ विषय क्र. | विषय | विषय सादर करणारी संघटना कार्यालय | कार्यवाहीशी संबंधीत कार्यालय | कार्यवाही / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | **५** |
| १ | दि. ७-५-०९ रोजी झालेल्या मागील सभेचे इतिवृत्तास मान्यता | | | **मागील सभेचे इतिवृत्त सर्व संबंधीतांना देण्यात आलेले असून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच शासना कडील सूचनेनुसार यापुढे माहे जुलै-०९ पासून जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक महिन्यातील दुस-या मंगळवारी सकाळी ११.० वाजता आयोजित करण्यात येणार असून त्यादिवशी सुटी आल्यास सुटीच्या आदल्या दिवशी सदर सभा आयोजित करण्यार असल्याची माहिती सदस्य सचिवांनी सभागृहास दिली व त्यानुसार औद्यो.संघटना व सर्व संबंधीत शासकीय यंत्रणांनी नोंद घेऊन त्वरीत कार्यवाही करावी व सभेत झालेल्या चर्चा/ निर्णया प्रमाणे केलेल्या अनुषंगीक कार्यवाहीचा अहवाल आठ दिवसात न चुकता जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच संघटनांनी नविन मुद्दे पुढील सभेच्या आठ दिवस अगोदर जिल्हा उद्योग केंद्रास पाठविण्याची व्यवस्था करावी असे ठरले. (कार्यवाही : सर्व औद्यो.संघटना व शासकीय कार्यालये)** |
| १ | अहमदनगर एमआयडीसी क्षेत्रांत पोलीस ऑउट पोस्ट बांधणेबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | जिल्हा पोलिस अधिक्षक/ एमआयडी सी | याबाबत मऔविमने औट पोस्ट बांधणेकरीता प्लॉट जिल्हा अधिक्षक यांचे नांवे केला आहे. पोलीस औट पोस्ट बांधुन देण्याचे औद्योगिक संघटनांनी मान्य केले होते त्यानुसार मराठा चेंबर यांनी आऊटपोष्ट बांधले असल्या बाबतचा अनुपालन अहवाल पुढील सभेत सादर करावा. **(कार्यवाही औद्योगिक संघटना व जिल्हा पोलीस अधिक्षक,अ.नगर)** |
| २ | मे.सनफार्माजवळ वाहने उभि असलेमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड अर्ट्रिड्ड ल्चर, अहमदनगर | महानगर पालिका, अहमदनगर | महानगरपालिकेने जकातीसाठी वाहने रोडवर उभी करु नये ती आंत मोकळया जागेत घ्यावी. तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी मऔविमची असुन याबाबत त्यांनी ठोस कार्यवाही करावी व वारंवार हा विषय चर्चेला येऊ नये अशा सुचना केल्या. **( कार्यवाही महानगरपालिका व मऔविम)** |
| ३ | महा.नॉनबायोडिग्रेडिबल गार्बेज नियंत्रण अध्यादेश २००६ व त्याअंतर्गत महा. प्लार्स्टी कपिशव्यांचे (कॅरीबॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ व महा. अविघटनशिल धनकचरा नियम २००६ बाबत | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | मऔविम | या संदर्भात मऔविमने अंतीम नोटीस देण्याची कार्यवाही त्वरीत करणे व धनकचरा टाकण्या करीता जागेची उपलब्धता उद्योजकांना त्वरीत करुन देण्याची सुचना मा. अध्यक्षांनी दिली. **( कार्यवाही : मऔविम)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | १. पाणी पुरवठयाच्या दरात वाढ होऊ नये.<br>२. मऔविमं क्षेत्रासाठी अतिरिक्त जमीन संपादन | मराठा चेंबर | मऔविमं | १. औद्यो.संघटनांनी असे मत मांडले की पाणी पुरवठयाच्या दरात शासनाने वाढ केली तरच मंडळास वाढ करण्याचा अधिकार आहे. तसेच सदरच्या विषयी एम सी सी आय ए. (मराठा चेंबर) यांनी मा. उच्च न्यायालयात रिट दाखल केली आहे व विषय न्यायप्रविष्ट आहे.<br>२. मऔविम ने अतिरिक्त भुसंपादनासाठी ७१६ हे. मौजे निमगांव वाघा चा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडुन मुख्य कार्यालयास सादर करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अधिकारींनी दिली. याबाबतचा पाठपुरावा प्रगती अहवाल मऔविमच्या अधिका-यांनी वेळोवेळी सभागृहात सादर करावा असे सर्वानुमते ठरले.**(कार्यवाही मऔविम, अहमदनगर).** |
| ५ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रासाठी मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी पाणी पुरवठयाची सोय होणे बाबत. | श्रीरामपूर एम आय डी सी असोशिएशन | मऔविमं | श्रीरामपुर औद्योगिकक्षेत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठयाची योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळाली असून निविदा माहे जुलै-०९ अखेर निघणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अधिकारींनी दिली. मा.अध्यक्षांनी सुचित केले की याबाबत सतत पाठपुरावा करुन त्वरीत काम पुर्ण करण्यात यावे व तसा अहवाल सभागृहास सादर करावा असे सर्वानुमते ठरले. **(कार्यवाही मऔविम, अहमदनगर.)** |
| ६ | फुडपार्क मधील प्लॉट व प्रगती | मराठा चेंबर | मऔविमं | भुखंड वाटप वरीष्ठ कार्यालयाच्या स्तरावरुन होत असून १६० भूखंड वाटप झालेले आहेत सामाईक सुविधा केंद्रासाठी रु. ४ कोटीची मान्यता मिळाली असून निविदा लवकर काढण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहिती मागविण्यात यावी असे मा. अध्यक्षांनी सांगीतले. तसेच मराविविमं कडुन विज पुरवठयाची कार्यवाही संथ गतीने होत आहे. रोड व पाणी पुरवठयाची सुविधा पूर्ण झाली आहे. यावर मा. अध्यक्षांनी वीज प्रश्ना बाबत पुढील सभेस अधिक्षक अभियंता, मराविविकं (स्थापत्य)व प्रादेशिक अधिकारी, मऔविमं नाशिक यांना आंमंत्रीत करण्याच्या सूचना दिल्या. **(कार्यवाही : मऔविम, मरावीवीकं व जिउकें)** |
| | नविन विषय | | | |
| १ | क्लस्टरसाठी भूखंड मिळणे | मराठा चेंबरं | मऔविमं | मंडळाचे अधिकारींनी खुलासा केला की सर्व्हेयरचे मत घेण्यात आले असून प्रस्ताव विभागीय कार्यालयास सादर करणार. सदस्य सचिवांनी खुलासा केला की यांत ८० टक्के रक्कम मदत म्हणुन केंद्र शासना कडुन मिळते. मा. अध्यक्षांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. **(कार्यवाही : जिउकें, औद्यो. संघटना)** |
| २ | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर वाहनासाठी विनंती थांब्यांची जागा निश्चित होणे. | मराठा चेंबर | मनपा | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर हल्ली कोणत्याही ठिकाणी थांबतात यामुळे रहदारीस नेहमी अडथळा होत असल्याने वाहनासाठी सावेडी बस स्थानका जवळ विनंती थांब्यांची जागा निश्चित केल्यास अपघात होणार नाहीत. मा.अध्यक्षांनी मनपाचे आयुक्तांशी पुढील सभेत चर्चा करण्याचे सांगीतले. **(कार्यवाही : मनपा )** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रातील भूखंडा मध्ये मोठ मोठे खड्डे करुन मुरुम चोरीला जात आहे. | श्रीरामपूर मऔविमं | मऔविमं | श्रीरामपूर मऔविमं च्या क्षेत्रातील जमीनीचे मुरुम चोरुन नेत असल्याने सुमारे २५ ते ४० फुट खोल खड्डे पडले आहेत. सदर जागेवरील भूखंड वाटप ज्यांना करण्यात येईल त्यांना भुखंड विकास कामासाठी भूखंडाच्या किंमतीपेक्षा अनेक पटींनी खर्च करावा लागेल. हा उद्योजकांस भूर्दंड आहे. याबाबत त्वरीत उपाय योजना करण्याची मागणी श्री काळे यांनी केली. यावर मा. अध्यक्षांनी सांगीतले की मऔविमं यांनी प्रत्यक्ष जाऊन जागेची पहाणी करावी व अहवाल ७ दिवसांत सादर करावा. **(कार्यवाही : मऔविमं.)** |

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त करुन मा.अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

स्वाक्षरी/------------
महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा उदयोग मित्र समिती , अहमदनगर

स्वाक्षरी/------------
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, अहमदनगर